गोमन्तक वर्धापनदिन
विशेषांक २००७

डॉ. रविराज अहिरराव

# वास्तुशास्त्र!

नवीन गुंतवणूक करायचीय? जमीन वा स्थावर जंगम प्रॉपर्टीतली गुंतवणूक दीर्घकालीन अवधीसाठी फायदेशीर ठरत असल्याने बरेच जण इन्वेस्टमेन्ट म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी प्रॉपर्टी खरेदी करून ठेवतात. वास्तुशास्त्रीय दृष्टिकोनातून अशी गुंतवणूक लाभदायक करणे सहज शक्य आहे. यात एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की एखादी वास्तू आपल्या मालकीची असली आणि आपण त्यात राहत असलो वा नसलो तरी त्या वास्तूचे गुण आपल्याला लाभ देतात आणि दोष त्रास देतात. अशी वास्तू तुमच्या मूळ वास्तूपासून शेकडो किलोमीटर दूर असली तरी तिचे चांगले - वाईट परिणाम तुम्हाला लागू पडतात. त्यामुळे केवळ आपण राहतो तीच वास्तू निर्दोष असणे पुरेसे न ठरता केवळ गुंतवणूक म्हणून खरेदी केलेली वास्तूही निर्दोष असावी असा आग्रह धरणे केव्हाही उचित असते. अशा वास्तूत वास्तुशास्त्र नियमांचे पालन केल्यास या वास्तूचा शुभ वास्तू गुणांक उच्च दर्जाचा असेल आणि ती वास्तू सर्वाधिक लाभदायक ठरेल असे खात्रीपूर्वक सांगता येते.

आज जो तो सुखाच्या मागे धावतोय, सुख मिळवण्यासाठी धडपडतोय. ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असो द्यावे समाधान अशी वृत्ती आजच्या पिढीकडे नाही. केवळ नशीब म्हणून दुःख स्वीकारायची मानसिकता आता लोप पावतेय. येन केन प्रकारेण सुख शांती समाधान त्याला हवेय. त्यासाठी वाटेल ते प्रयत्न करायची त्याची तयारी आहे. तेव्हा शैक्षणिक प्रगती, उद्योगधंदा, व्यवसायात बरकत, आरोग्य व मन:शांती, कुटुंबसौख्य, संतानसुख... यापैकी जे काही नाही ते मिळवण्यासाठी मानवी धडपड चाललेली असते. राहत्या वास्तूचा सखोल व वास्तुशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करून वास्तुशास्त्राच्या मदतीने गृहसौख्य मिळत असले तर हवेच आहे. वास्तुशास्त्राभोवती असलेले प्राचीनतेचे वलय आणि आधुनिक विज्ञानाची जोड यांची सांगड घालत उचित उपाय योजना करून हवे ते रिझल्ट मिळवण्याकडे कल वाढत चाललाय. संकटाने गांगरून जाणे, गोंधळणे, गांगरणे यापेक्षा बिकट परिस्थितीतून मार्ग कसा काढावा यावर जाणीवपूर्वक विचार होऊ लागलाय. वास्तुशास्त्राला शास्त्रीय बैठक आहे व ते वैज्ञानिक दृष्टिकोनातून पडताळून पाहता येते. त्यामुळे हे ही एक विज्ञान आहे ही भावना जनमानसात रुजत चाललीय.

**गृहसंकल्पपूर्तीसाठी..!**

खास करून वीकएंड होम, सेकंड होम किंवा ड्रीम होममध्ये वास्तुशास्त्राचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणावर करता येणे सहज शक्य आहे. याठिकाणी मोठमोठ्या भूखंडाची छोट्या-छोट्या प्लॉटमध्ये विभागणी करताना अंतर्गत रस्ते, प्रकल्पाचे मुख्य प्रवेशद्वार, गार्डन, जॉगिंग ट्रॅक, क्लबहाऊस, इलेक्ट्रिक ट्रान्सफॉर्मर, भूगर्भातर्गत पाण्याची टाकी, प्रत्येक प्लॉटला वैयक्तिक पातळीवर शुभ दिशेतून प्रवेशद्वार (गेट), प्रत्येक प्लॉटमधील वास्तूचे स्थान, या सर्व गोष्टीचे अगदी पूर्णपणे वास्तुशास्त्रानुसार नियोजन करता येते. तसेच वैयक्तिक बंगल्यातसुद्धा प्रवेशद्वार दिवाणखाना, किचन, बेडरूम, टॉयलेट, बाथरूम, देवघर, घराचा मध्यभाग (ब्रम्हतत्व) तसेच चौकोनी आयताकृती आकारात अंतर्गत व बाह्य स्वरूप (एश्रर्रीरीळेप) रंगसंगती, सर्व खोल्यांमधील अंतर्गत रचना, उदा: दिवाणखाण्यातील गृहप्रमुख व अतिथी बैठक व्यवस्था, टी.व्ही. शोकेस, चपलांचे रॅक व अन्य शोभादायक वस्तूंची रचना, किचनमधील सर्व वस्तूंची रचना, व्यवस्था, बेडरूमधील शयन व्यवस्था, कपाट, तिजोरी, एअरकंडिशनर या व अन्य सर्व गोष्टी, मुलांच्या अभ्यासाचे टेबल, देवघराचे स्थान व रचना अशा अनेक गोष्टीचे अगदी शंभर टक्के वास्तुशास्त्रानुसार नियोजन करता येते.

तसेच बंगल्यासभोवतालच्या परिसरातील बाग-बगीचा व त्यातील झाडांची रचना याबद्दलसुद्धा वास्तुशास्त्रात सखोल मार्गदर्शन तत्त्व उपलब्ध आहेत. त्यानुसार बंगला पूर्णपणे वास्तुशास्त्रानुसार परिपूर्ण करता येऊ शकतो.

**बिना तोडफोड उपाय**

मोठमोठ्या गृहसंकुलात किंवा अगदी एक अथवा दोन बिल्डींगच्या प्रकल्पात संपूर्ण बांधकाम शंभर टक्के वास्तुशास्त्रानुसार होऊ शकणार नाही हे त्रिवार सत्य आहे. परंतु जी घरे कुठल्याही वास्तुसंकल्पनेशिवाय बांधण्यात आली आहेत तेथे बऱ्याचदा वास्तुशास्त्राची टक्केवारी ३०-४० टक्क्यांच्या आसपास असते. पण जर योग्य नियोजनाद्वारे बिल्डिंग अथवा संकुले बांधली तर ६५-८५ टक्के वास्तुशास्त्रानुरूप घरे बनू शकतात. महत्वाच्या गोष्टींत फेरबदल केल्यास जे काही मूळ बांधकाम प्रवेशद्वार, लिव्हिंग रूम, किचन, बाथरूम-टॉयलेट, बेडरूम अथवा टेरेस असेल त्यातच थोडी अदलाबदल (त्रीळशर्पीरीळेप) केल्यास त्याच वास्तूची 'सकारात्मक शक्ती' वाढते.

विशेष म्हणजे गृहरचनेच्या दृष्टिकोनातूनसुद्धा कुठल्याही अडचणी देण्याची शक्यता नाही. मुळात जर आर्किटेक्टने मनापासून या संकल्पनेला अंगीकारण्याची ठरविले तर तांत्रिक अथवा अशक्य बाबी सहज शक्य होऊ शकतात. तसेच मूळ आराखडा बनवतानाच जर प्लॅनिंग व डिझाईनिंग वास्तुशास्त्रानुसार केले तर कुठल्याही प्रकारे खर्च वाढण्याची शक्यता नाही. उलटपक्षी वास्तुशास्त्रानुसार बांधकाम केल्यास असे आढळून आले आहे की प्रकल्प विनासायास, कुठल्याही अडचणी न येता, सुरळीतपणे पार पडतो. पण जर का प्लॉटचा आकार, आजूबाजूचा चढ-उतार, प्लॉट सभोवतालचा रस्ता तसेच वास्तू आराखड्यात फार मोठ्या प्रमाणावर गंभीर स्वरूपाचे वास्तुदोष निर्माण झाल्यास तो प्रकल्प रखडणे, काही कारण नसताना अडचणी येणे, फ्लॅटची विक्री न होणे असे अनुभव येऊ शकतात. अशा अनेक प्रकल्पांना विनातोडफोड उपाययोजना देऊन अगदी विस्मयजनक रिझल्ट मिळवून देता येतात, दिलेले आहेत. मुळात प्रकल्प लांबला म्हणजे खर्च (उैी) वाढतो व नफ्याचे प्रमाण कमी होते.

वास्तुदोष आपल्या आजच्या निवास पद्धतीमधील अविभाज्य घटक बनले आहेत. काही दोष तांत्रिक अडचणीमुळे तर काही दोष आपली गरज म्हणून किंवा केवळ अंगवळणी पडले असल्याने ते सोबत घेऊनच आपण वास्तुनिर्मिती करीत असतो. अशा वेळी या दोष निवारणासाठी काही सर्वसाधारण उपाययोजना करून या वास्तुदोषांची तीव्रता कमी करणे अत्यावश्यक ठरते.

थोडक्यात सांगायचे तर लाखो रुपये खर्च करूनसुद्धा ५०-६० टक्के वास्तुदोष आपण खरेदी करतो पण त्यांच घरासाठी काही हजार रुपये खर्च करून उपाययोजनांच्या माध्यमातून ते दोष पूर्णपणे दूर करू शकतो. आयुष्यभरासाठी म्हणूनच वास्तुशास्त्रासाठी केलेला खर्चही एक गुंतवणूक आहे, जी घराच्या किमतीच्या मानाने नगण्य पण परिणामकारकतेच्या अनुषंगाने अत्यंत मौल्यवान ठरते. त्यामुळे घर खरेदी करताना हे सर्व योग्य प्रकारे पूर्ण करून घेणे नक्कीच हितावह आहे. या उपाययोजनांच्या माध्यमातून वास्तू ९५ टक्के लाभदायी करता येते.

आपण ज्या वास्तूत राहतो ती काही वर्षांपूर्वी खरेदी केलेली असेल व त्यावेळी कदाचित तुम्ही वास्तुशास्त्राबद्दलची माहिती, महत्व आणि उपयुक्तता याबद्दल अनभिज्ञ असाल परंतु काळाच्या ओघात जेव्हा आपल्यावर आघात होऊ लागतो तेव्हा आपण त्यांचा विचार करू लागतो की असे का होते? आणि जर त्यास वास्तुदोष कारणीभूत असेल तर त्या वापरातील अथवा अस्तित्वातील वास्तूमध्ये तोडफोड करणे अथवा ती विकून दुसरी घेणे दोन्ही गोष्टी घेणे दोन्ही गोष्ट अत्यंत कठीण असतात. अशावेळी काय करावे, असा प्रश्न असलेले लोक संख्येने खूप आहेत. माझ्या अनुभवाच्या आधारावर मी असे ठामपणे म्हणू शकतो की साधारणपणे ७५-८० टक्के ग्राहक राहत्या घराचे वास्तुशास्त्र करून घेणारे असतात. २० टक्के ग्राहक नवीन घराची निवड करण्यासाठी येतात तर केवळ पाच टक्के ग्राहक नियोजित घरकुलाचा आराखडा तयार करून घेण्यासाठी येत असतात.

ज्याठिकाणी तोड-फोड करून घरातील रचनेत बदल करून वास्तुदृष्ट्या फलदायी करणे शक्य नसते, त्याचप्रमाणे असे घर सहजासहजी विकले पण जात नसेल तर ते कुटुंब चिंतातूर झालेले असते. अशावेळी विनातोडफोडीच्या उपाययोजना म्हणजे त्यांच्यासाठी अत्यंत आनंददायक पर्याय ठरतो. यामुळे कुठेही तोडफोड नाही, त्रास नाही, कटकट नाही. फक्त काही निवडक ठिकाणी काही यंत्र, पिरॅमिड्स व शुभ चिन्हे लावून ऐका विशिष्ट कालावधीत त्यातून चांगले फलदायी परिणाम मिळू लागतात. आजपर्यंत हजारो केसेसच्या माध्यमातून मिळालेले रिझल्टस् हाच या गोष्टीचा पुरावा आहे.